




दैनिक निडर निर्भिड **जनसंचलन**

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३०८ वा    गुरूवर दि २६ फेब्रुवारी २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# शेगाव येथे राष्ट्रीय आरोग्य मेळावा राष्ट्रपतींच्या हस्ते शुभारंभ औषधी वनस्पतींचे संवर्धन ही लोकचळवळ व्हावी-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

**जनसंचलन/बुलडाणा**

आयुर्वेद व योगशास्त्र ही भारतीय ज्ञान परंपरा जगाला स्वस्थ भविष्याची ग्वाही देणारी आहे. त्याचा अवलंब व प्रसार होत असतानाच, औषधी वनस्पतींचे संवर्धनही होणे आवश्यक आहे. हा केवळ शासनप्रशासनाचा उपक्रम न राहता लोकचळवळ व्हावी, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केले. केंद्र शासनाचे आयुष मंत्रालय व अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्यातर्फे शेगाव येथील विसावा भक्तनिवास संकुल परिसरात आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, आमदार संजय कुटे, आयुष मंत्रालयाचे सचिव पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष प्रो. राकेश शर्मा, महासंमेलन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देवेंद्र त्रिगुणा आदी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, मन व शरीर या दोहोंचे संतुलन साधून संतुलित व आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा मंत्र योग व आयुर्वेदातून मिळतो. आरोग्यं परमं सुखम्फ ही आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. शरीर हे सर्व कर्तव्ये पूर्ण करण्याचे साधन आहे. देशाला सशक्त बनविण्यासाठी नागरिकांचे जीवन आरोग्यपूर्ण असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने योग, आयुर्वेद, युनानी आदी आयुष पद्धती महत्वाची भूमिका बजावतात. आयुष मंत्रालयातर्फे अखिल भारतीय आयुर्वेद संस्थांची स्थापना, आयुष औषधालये, औषधे परीक्षण प्रयोगशाळा, वैश्विक पारंपरिक चिकित्सा केंद्राचे पुनरूज्जीवन अशी महत्वाची पावले उचलण्यात येत आहेत. याबरोबरच औषधी वनस्पतींचे संवर्धन, क्षेत्रविस्तार होणेही आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न व्हावेत, असे राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांनी यावेळी सांगितले. राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले की, भारतीय आहारपद्धतीत पूर्वापार औषधी तत्वे असलेल्या वनस्पतींचा वापर होत आला आहे. व्यक्तीला कधीही आजारपण उद्भवू नये अशी सोय आपल्या पारंपरिक ज्ञानावर आधारित जीवनपद्धतीत होती. तथापि, आता आहारात अनावश्यक पदार्थांचा अंतर्भाव झाल्याने आजार वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे आयुर्वेद व आयुष पद्धतींचा प्रसार आयुष मंत्रालयातर्फे होत आहे. तो अधिक व्यापक व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले की, निरामय जीवनशैली, मवेलनेसफ व मसमग्र स्वास्थ सुरक्षाफ ही मआयुषफची आधारशीला आहे. जग आज मवेलनेसफकडे वळले असून, भारतातील प्राचीन व पारंपरिक आयुष पद्धतीच्या संवर्धन व अवलंबामुळे आपला देश संपूर्ण जगात अग्रेसर ठरेल. औषधी वनस्पती उत्पादक शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ होईल. महाराष्ट्रातही वेगळे आयुष मंत्रालय असावे यासाठी प्रयत्न होत आहेत. आयुष चिकित्सा व उपचारपद्धतीचा लाभ विदर्भ व



महाराष्ट्रातील गरजूंना मिळावा यासाठी हा राष्ट्रीय आरोग्य मेळावा शेगावात आयोजित केला असल्याचेही त्यांनी सांगितले. पालकमंत्री श्री. जाधव पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. आयुर्वेद क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ वैद्यांना यावेळी गौरविण्यात आले. गिनीज बुक ऑफ रेकॉर्डतर्फे आयुष मंत्रालयाला मिळालेले प्रमाणपत्र राष्ट्रपती महोदयांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. वैद्य श्री. कोटेचा यांनी प्रास्ताविक केले. अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे महासचिव वैद्य एस. एन. पाण्डेय, मेळाव्याच्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. आशुतोष गुप्ता, महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्ष वैद्य सतीश भट्टड, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधिक्षक नीलेश तांबे आदी उपस्थित होते.

# तुरीच्या गंजीला लागलेल्या आगीत मुलाचा मृत्यू, धक्क्याने आईनेही सोडले प्राण

**जनसंचलन/मलकापूर**

गंजीला लागलेल्या आगीत होरपळून सात वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच आजारामुळे अंथरुणाला खिळून पडलेल्या आईनेही धक्क्याने प्राण सोडल्याची हृदयद्रावक तालुक्यातील घटना हरणखेड येथे २२ फेब्रुवारी रोजी घडली. हरणखेड येथील शेतकरी संदीप होले (३५) हे २२ फेब्रुवारी रोजी सकाळी शेतात गेले होते. दुपारी त्यांचा मुलगा ओम सोमवारी मृत मुलगा व आईवर शोकाकूल वातावरणात करण्यात आले अंत्यसंस्कार संदीप होले (७) त्यांना घरी बोलावण्यासाठी शेतात आला. त्या ठिकाणी तुरीच्या पेंढ्या गोळा करून बैलगाडीवर रचण्यात आल्या होत्या. त्यावर ओम बसला होता. दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास बैलगाडीच्या सभोवतालचा कचरा पेटविण्याचे काम सुरू असताना अचानक जोराचा वारा सुटला. पेटलेल्या कचऱ्यातील ठिणगी बैलगाडीवरील तुरीच्या पेंढ्यांवर पडताच क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. संदीप होले यांनी आरडाओरडा केला; मात्र तोपर्यंत चिमुकला आगीत सापडला

आई व मुलावर एकाच दिवशी अंत्यसंस्कार

तुरीच्या गंजीला लागलेल्या आगीत मृत्युमुखी पडलेला ओम होले आणि त्या धक्क्याने प्राण सोडलेल्या त्याची आई वनिता होले या मायलेकांवर २३ फेब्रुवारी रोजी एकाच दिवशी अंत्यसंस्कार करण्यात आले. होता. गंभीररीत्या भाजलेल्या ओमला आगीतून बाहेर काढून उपचारासाठी मलकापूर येथे नेण्यात आले. त्यानंतर जळगाव येथे हलविले; उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही घटना कळताच संदीप होले यांच्या पत्नी वनिता होले (३२) यांना धक्का बसला.

# अनधिकृत स्कूल व्हॅनच्या धडकेतील दुसऱ्या जखमीचा मृत्यू

**जनसंचलन/बुलढाणा**




वाहतूक करणाऱ्या अनधिकृत स्कूल व्हॅनच्या अपघातात जखमी झालेल्या दुसऱ्या तरुणाचाही उपचारादरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झाल्याने देऊळघाट परिसरात शोककळा पसरली आहे. भरधाव व्हॅनने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोन मित्रांचा आठ दिवसांच्या अंतराने मृत्यू झाला. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास बुलढाणा-देऊळघाट मार्गावर हॉटेल निवांत जवळ हा अपघात झाला होता. देऊळघाट येथील रियाज बेग जफर बेग (३८) आणि शेंदुर्णी (जि. जळगाव) येथील शे. तौसिफ शे. युसूफ (३८) हे दोघे दुचाकीने देऊळघाटकडे परतत असताना, मागून आलेल्या व्हॅनने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोन्ही वाहने शेतात उलटली. व्हॅनमध्ये काही शालेय विद्यार्थीही होते. या अपघातात तौसिफ यांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी रियाज यास प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालय व नंतर छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएममध्ये भरती कोले होते. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# रेरा रद्द करण्यात कोणाचे हित?




ङ्करेरा ही संस्था दिवाळखोर होणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांना मदत करण्याशिवाय काहीही करत नाही. ज्यांच्यासाठी रेराची स्थापना केली त्यांना कोणताही दिलासा मिळत नाही. त्यामुळे रेरा कायदाच रद्द करावा,फ अशा कठोर शब्दात भारताचे सरन्यायाधीशच व्यक्त झाल्यामुळे रेरा कायद्यातील उणीवा आणि रेरा कायद्याच्या सहेतुक ढिसाळ अंमलबजावणीचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. रेरा कायदा भारतात पूर्णांशाने एक मे २०१७ पासून अंमलात आला. ५०० चौरस मीटर क्षेत्रफळाहून जास्त किंवा आठपेक्षा जास्त सदनिका असलेला प्रत्येक गृहप्रकल्प रेरा कायद्याअंतर्गत राज्य रेरा प्राधिकरणाकडे (महाराष्ट्रात महारेराकडे) नोंदणीकृत होण्याचे बंधन घालण्यात आले. ही नोंदणी करताना इमारतीचा नकाशा, संबंधित बांधकाम परवानगीचा दाखला आणि नियोजित गृह प्रकल्पाची संपूर्ण माहिती देणे, तसेच सदनिकांचा ताबा केव्हा देणार हे शपथपत्रावर देणे विकासकांना अनिवार्य करण्यात आले. ग्राहकांकडून मिळणाऱ्या रकमेतील ७० टक्के रक्कम स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्याचे बंधन आणि त्यातून बांधकाम प्रगतीनुसार रकमा काढण्यावर रेरा प्राधिकरणाची देखरेख या कायदेशीर तरतुदींमुळे घर खरेदीदार बराचसा सुरक्षित झाला. तसेच एकूण सदनिकांच्या पैकी ५१ % सदनिकांची विक्री होताच तीन महिन्यात विकासकाने सदनिकाधारकांची सहकारी संस्था स्थापन करणे, ताबा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर तीन महिन्याच्या आत इमारतीचे सहकारी संस्थेच्या नावे हस्तांतरण करणे अशी बंधनेसुद्धा रेरा कायद्यात घालण्यात आली. नोंदणी झालेल्या प्रत्येक गृह प्रकल्पाची संपूर्ण माहिती रेराच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याची तरतूदही रेरा कायद्यात करण्यात आली. अशी रीतसर नोंदणी होण्यापूर्वी सदनिका विक्रीवर आणि त्या संबंधित जाहिरातींवर बंदी घालण्यात आली. ग्राहकाशी विक्री करारनामा केल्याशिवाय मूळ किंमतीच्या दहा टक्क्यांहून अधिक रक्कम घेण्यास मज्जाव करण्यात आला. ताबा देण्यास विलंब होत असेल तर विलंब काळासाठी विकासकाने घर खरेदीदाराला एकूण भरलेल्या रकमेवर ठराविक दराने दरमहा व्याज देण्याचे बंधनही कलम १८ द्वारे घालण्यात आले. इतकेच नव्हे तर विलंब झाल्याने ज्या ग्राहकांना नोंदणी रद्द करायची असेल त्यांना त्यांची संपूर्ण रक्कम ठराविक व्याजाने ३० दिवसांच्या आत परत करण्याचे बंधनही विकासकांवर घालण्यात आले. ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी ६० दिवसांची कालमर्यादा रेरा कायद्याने निश्चित करून बाधित ग्राहकांना जलद दिलासा देण्याची तरतूदही करण्यात आली. ग्राहकाला परतावा आणि व्याज देण्याबाबतच्या आदेशाला विकासकाला अपिलाद्वारे आव्हान करायचे असल्यास अपील प्राधिकरणापुढे ही संपूर्ण रक्कम प्रथम जमा करण्याची ग्राहकाभिमुख तरतूदही रेरा कायद्यात करण्यात आली, जेणेकरून विकासक नाहक अपील मागून अपील करत ग्राहकाला नाडणार नाही. या पार्श्वभूमीवर रेरामुळे फक्त विकासकांचाच फायदा झाला हे सरन्यायाधीशांचे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. रेरामुळे यापूर्वी कधी नव्हती इतकी पारदर्शकता या क्षेत्रात आली हे मान्य करावेच लागेल. त्याचबरोबर विकासकांचे ग्राहकांपरती उत्तरदायित्व स्थापित झाले आहे. अशा परिस्थितीत इतक्या अनेक ग्राहकाभिमुख तरतुदी असलेला रेरा कायदा त्याच्या ढिसाळ किंवा सहेतूक निष्क्रिय अंमलबजावणीमुळे रद्द करावा का? तर त्याचे उत्तर ङ्कनाहीफ असेच आहे. कोणताही कायदा हा परिपूर्ण असूच शकत नाही. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यावर या कायद्यातील काही त्रुटी अथवा उणिवा ध्यानात येतात. त्यावर उपाय म्हणजे वेळोवेळी या कायद्यात अनुषंगिक सुधारणा करणे. कायदा कितीही चांगला असला तरी त्याची उपयुक्तता आणि प्रभाव हा त्याच्या अंमलबजावणीवरच अवलंबून असतो. येत्या १ मे रोजी रेरा कायदा अंमलात येऊन नऊ वर्षे पूर्ण होतील. या दरम्यान या कायद्यात कोणत्या उणीवा लक्षात आल्या ते बघणे उचित ठरेल. पुनर्विकासातील जुन्या रहिवाशांना दिलासा हवा : रेरा कायद्यात याबद्दल असलेल्या तरतूदीचा योग्य अर्थ महारेरा प्राधिकरणाने न लावल्याने राज्यातील हजारो पुनर्विकास प्रकल्पातील लक्षावधी जुन्या रहिवाशांना रेरा कायद्याचा लाभ मिळू शकला नाही. त्यामुळे रेरा कायद्यात यासंबंधी सुस्पष्टता आणण्यासाठी आवश्यक ती दुरुस्ती करणे गरजेचे आहे. दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या एका रियल इस्टेट परिषदेत मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सुदैवाने विकासकांच्या संघटना, अनेक राज्यातील रेरा अध्यक्ष इतकेच नव्हे तर खुद्द केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनहरलाल खट्टर यांनी याबाबतीत अनुकूलता दर्शवल्याने पुनर्विकासातील जुन्या रहिवाशांना लवकरच रेराअंतर्गत दिलासा मिळण्याची दाट आशा आहे. रेरा कायद्यातील कलम ३(२)अ अंतर्गत तरतुदीचा कायद्याला अभिप्रेत असा अर्थ न लावल्याने राज्यात आणि विशेषतः मुंबईत ५०० चौ. मीटर्सहून कमी क्षेत्रफळाच्या भूखंडावर आज चक्क २०० ते २५० सदनिका असलेले वीस ते तीस मजली टॉवर्सचे मोठमोठे गृहनिर्माण प्रकल्प रेरा कायद्यातून वगळून अनेक मोठ्या बिल्डर्सना महारेराने अभय दिले आहे. हा मुद्दा सुद्धा मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे दिल्लीतील परिषदेत मांडण्यात आला आणि त्यावरही माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. एखाद्या विकासकाने रेरा प्राधिकरणाचे अथवा न्यायिक अधिकाऱ्याचे आदेश अंमलात आणण्यास टाळाटाळ केल्यास वा नकार दिल्यास रेरा कायद्यामध्ये फक्त आर्थिक दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. याउलट ग्राहक संरक्षण कायद्यात अशा चुकार विकासकाला तीन वर्षापर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेचीही तरतूद आहे. अशीच तरतूद रेरा कायद्यात सुद्धा करणे गरजेचे आहे. रेरा कलम ४१ अन्वये केंद्रीय सल्लागार परिषद स्थापन करण्याची तरतूद आहे. त्याच धर्तीवर राज्य स्तरावरही सल्लागार परिषद स्थापन करण्याची दुरुस्ती मुंबई ग्राहक पंचायतीने प्रस्तावित केली आहे. रेरा प्राधिकरणाकडून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रत्येक राज्यात एक ङ्कउच्चाधिकार देखरेख यंत्रणाफ निर्माण केल्यास रेरा प्राधिकरणांवर वचक राहून त्यांच्या कामातील दिरंगाई आणि बिल्डर धार्जिण्या कृतींना आळा बसू शकेल. आज रेरा कायद्यात राज्य रेरा प्राधिकरणांना कोणतेच उत्तरदायित्व नसल्याने असंख्य घर खरेदीदार ग्राहक हे रेरा कायद्याने दिलेले लाभ मिळण्यापासून वंचित आहेत.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राज्यपालांच्या भाषणात अजित पवार यांच्याबद्दल चकार शब्द नाही', जयंत पाटील यांनी घेरलं

**मुंबई :** राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी आज विधानसभेत भूमिका मांडली. जयंत पाटील यांनी यावेळी राज्यपालांच्या अभिषात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल एकही शब्द नसल्याने नाराजी व्यक्त केली. तसेच या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिमंडळावरही निशाणा साधला. 'राज्यपालांचं अभिभाषण म्हणजे मंत्रिमंडळाचं भाष्य. शब्द मंत्रिमंडळाचे असतात. मंत्रिमंडळाने हे भाषण तयार केलेलं असतं. मला धक्का या गोष्टीचा बसला. या अभिभाषणात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल एक चकार शब्द सुद्धा काढलेला नाही. किमान राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांनी तरी मंत्रिमंडळात आग्रह धरायला हवा होता की, अजित दादांबद्दल दोन ओळी तरी अभिभाषणात असावेत. राज्यपालांनी अभिभाषणात अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणणे अपेक्षित होतं.मला खात्री आहे, मुख्यमंत्री अर्थसंकल्प सादर कताना तसा उल्लेख करतील, पण राज्यपालांच्या अभिभाषणात येणं आवश्यक होतं', असं म्हणणं जयंत पाटील यांनी मांडलं.अभिभाषणात सुरुवातीला सर्व महापुरुषांची नावे घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घेतलं, भगवान बिसवा मुंडांचं घेतलं, अहिल्यादेवी होळकरांचं घेतलं, पण या सरकारने भाषणात ती नावे वापरली पण कृती काय? पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा मणकर्णिका घाट तिकडे उत्तर प्रदेशात बांधलेला आहे. तिथल्या सत्तारुढ पक्षाच्या धोरणाने तो घाट तोडण्यात आला. मुर्त्यांचा विध्वंस करण्यात आला. मी त्या घाटावर पूर्वी एकदा जावून आलेलो आहे. अतिशय सुंदर आणि देखणा असा घाट, पण तिथल्या सरकारने तो घाट मोडला. तिथल्या मूर्त्यांचा पूर्णपणे नायनाट केला',



असं जयंत पाटील म्हणाले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या घाटाला तिथल्या सरकारने सहजासहजी बाजूला ढकललं. माझी सरकारला विनंती आहे की, सरकारने जसा तो घाट होता तसाच तो बांधून घेतला पाहिजे. त्याची भरपाई त्या उत्तर प्रदेश सरकारने केली पाहिजे, तिथल्या मुख्यमंत्र्यांनी त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा देशाला तर आहेच पण आम्हा सर्वांनादेखील अभिमान आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी बांधलेला घाट पाडण्याचं धाडस तिथल्या योगींच्या सरकारला होत असेल, तर मला खात्री आहे, महाराष्ट्राच्या विधानसभेत तरी कुणी हे मान्य करणार नाही. त्याचा निषेध करणं आणि त्या राज्य सरकारला पुन्हा तो घाट जसा होता तसा बांधून द्यायला लावणं हे महत्त्वाचं काम सरकार करेल, अशी अपेक्षा आहे', असं मत जयंत पाटील यांनी मांडलं.बिरसा मुंडांचं नाव आपण घेतो, पण आदिवासी बांधवांच्या आयुष्यात आपण काय सुधारणा केली, याचा अभिभाषणात उल्लेख पाहिजे. आदिवासी विभागाला जो निधी दिला जातो तो दुसऱ्या विभागाकडे वळते करण्याचं काम केलं जातं', असा आरोप जयंत पाटील यांनी केला. हा वाद किती वर्षे चालणार आहे? दरवर्षी अभिभाषणाच्या शेवटी उल्लेख करायचा आणि सोडून द्यायचा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी प्रलंबित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: वकील आहेत. त्यांनी काही पावलं उचलली तर निकाल आपल्या बाजूने लागू शकतो. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आपल्या चांगल्या संपर्कांचा वापर करुन ही केस पटलावर आणावी, त्याची सुनावणी पूर्ण करुन महाराष्ट्रातले जे सीमाबांधव आहेत त्यांना न्याय देण्यासाठी काम करावं', अशी मागणी जयंत पाटील यांनी केली.

## अजित पवारांची बारामती सुनेत्रा पवारांच्याच हाती

**पुणे :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. या विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनर्परीक्षण कार्यक्रम आयोगाने जाहीर केला असून १ जानेवारी २०२६ पर्यंत नाव नोंदवलेले मतदार या पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार आहेत. या मतदारसंघासाठी १० मार्चला अंतिम प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तर बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारावर शिक्कामोर्तब झाला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती पोटनिवडणूक लढवणार असल्याची माहिती आता समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पोटनिवडणूक लढण्यावर सर्वांचं एकमत झालं आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी निवडणुकीची घोषणा होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बारामती निवडणूक बिनविरोध करण्यावर भर असणार आहे.आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाकडून घेण्यात आल्याची माहिती देखील मिळाली आहे आहे. सोमवारी २३ फेब्रुवारी रोजी रात्री मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती मिळाली आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते.राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राजभवन येथे झालेल्या कार्यक्रमात राज्यपालांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

## ठाकरेंचे ३, काँग्रेसचा १, भाजपचे ४ तर शिंदेंचे २, महापौरांकडून स्वीकृत नगरसेवकांची घोषणा..

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या महापौर रितू तावडे यांनी आज सर्व स्वीकृत नगरसेवकांची घोषणा केली. बंद लिफाफ्यात दहा स्वीकृत नगरसेवकांची नावे आणण्यात आली होती. रितू तावडे यांनी सर्वपक्षीय स्वीकृत नगरसेवकांची घोषणा केली. यावर्षी मुंबई महापालिकेतील पक्षीय संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला स्वीकृत नगरसेवकांची संख्या जास्त आहे. भाजपच्या वाट्याला ४, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ३, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला २ तर काँग्रेसला १ स्वीकृत नगरसेवकपद मिळालं आहे. या चारही पक्षांकडून स्वीकृत नगरसेवक पदासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या स्वीकृत नगरसेवक पदासाठी प्रत्येक पक्षाकडून कुणाकुणाला संधी दिली जाईल? याकडे सर्वांचं लक्ष होतं. अखेर याबाबतची अधिकृत नावे आता खुद्द महापौर रितू तावडे यांच्याकडूनच जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबतचा सस्पेन्स आता संपला आहे. प्रतीक मधुसदन कर्पे हे भाजपचे सक्रिय नेते आहेत. ते भाजपचे मुंबईचे सचिव आहेत. याआधी त्यांनी मुंबई महापालिकेत शिक्षण समितीचं सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. ते २०१७ ते २०१२ या काळात शिक्षण समितीचे सदस्य होते. त्यांनी भाजपच्या अंतर्गत संघटनात्मक रचनेत महत्त्वाची पदे भूषविली आहेत.प्रवीण छेडा हे चारवेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात भाजपमधून झाली होती. पण २०१२ मध्ये त्यांनी अंतर्गत मतभेदांमुळे काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. ते काँग्रेसमध्ये असताना मुंबई महापालिकेत विरोधी पक्षनेते देखील होते. तसेच २००८ मध्ये त्यांची बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. दरम्यान, त्यांनी २०१९



मध्ये काँग्रेसमधून परत भाजपात प्रवेश करत घरवापसी केली होती. मुंबई महापालिकेतील त्यांचा नगरसेवक म्हणून प्रदीर्घ अनुभव पाहता भाजपने त्यांना पुन्हा महापालिकेत पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.नितेश सिंह हे भाजपचे उत्तर मध्य मुंबईचे सरचिटणीस आहेत. त्यांनी २०१७ मध्ये मुंबई महापालिकेची निवडणूक लढवली होती. तसेच ते पूर्वी काँग्रेसमध्ये होते. ते सध्या भाजपमध्ये सक्रिय असून पक्षाने आता त्यांची नियुक्ती स्वीकृत नगरसेवकपदी केली आहे.कमलाकर दळवी हे भाजपचे ज्येष्ठ नेते असून ते भाजपचे मुंबई उपाध्यक्ष आहेत. मंत्री आशिष शेलार यांचे ते निकटवर्तीय मानले जातात. त्यांनी २०२६ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २२५ मधून भाजपच्या अधिकृत उमेदवार हर्षिता नार्वेकर यांच्या विरोधात बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या मध्यस्थीनंतर त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला होता.

## सलग ८ टर्म आमदार, काँग्रेसचा अजातशत्रू नेता राज्यसभेवर? हालचालींना वेग

**मुंबई :** राज्यसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी कोणाला संधी देणार याकडे राजकीय वतुर्ळाचं लक्ष लागलं आहे. राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यातील केवळ १ जागा मविआला जिंकता येईल. त्यामुळे मविआला कोणाला उमेदवारी देणार याबद्दल उत्सुकता आहे. शरद पवार पुन्हा राज्यसभेच्या रिंगणात उतरल्यास निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. काँग्रेस किंवा ठाकरेसेनेनं उमेदवार दिल्यास महायुतीकडून सातवा उमेदवार दिला जाऊ शकतो. त्या स्थितीत क्रॉस व्होटिंगचा धोका आहे.शरद पवार राज्यसभेवर जाण्यासंदर्भात अद्याप तरी जाहीरपणे काहीही बोलले नाहीत. शरद पवारांना राज्यसभेवर जाण्याची इच्छा



आहे आणि त्यांनी ती इच्छा माझ्याकडे बोलून दाखवली होती, असा दावा ठाकरेसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला होता. राऊत यांनी पवारांना पाठिंबा देऊ, अशी भूमिका घेतली. पण त्यांच्याच पक्षाचे नेते, आमदार आदित्य ठाकरेंनी राज्यसभेच्या जागेवर दावा सांगितला आहे. तर दुसरीकडे काँग्रेसदेखील या जागेसाठी प्रयत्नशील आहे. काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांनी कालच उद्धव ठाकरेंची मातोश्रीवर भेट घेतली आहे. राज्यातील काँग्रेसमधील बहुतांश नेते राज्यसभेची जागा आपल्याकडे राहावी यासाठी प्रयत्नशील आहेत.शरद पवार यांच्या सोबतच ठाकरेसेनेच्या प्रियांका चतुर्वेदी, काँग्रेसच्या रजनी पाटील यांच्या राज्यसभेचा कार्यकाळ संपत आहे. चतुर्वेदी पुन्हा एकदा संधी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी त्यांनी लॉबिंग सुरु केलं आहे. तर दुसरीकडे काँग्रेस ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना राज्यसभेवर पाठवायच्या विचारात आहे. नुकतीच मुंबईत काँग्रेसची एक बैठक झाली. त्या थोरात यांच्या नावासंदर्भात चर्चा झाली. थोरात नुकतेच दिल्लीला जाऊन आले आहेत. संसदेचं कामकाज कसं चालतं याचा अनुभव त्यांनी नुकताच घेतला.काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य असलेल्या बाळासाहेब थोरात यांना राज्यसभेवर पाठवण्याचा विचार पक्षातून सुरु आहे. १९८५ ते २०२४ अशी सलग ३९ वर्षे ते आमदार राहिले आहेत. १९८५ मध्ये ते संगमनेरमधून पहिल्यांदा अपक्ष म्हणून विजयी झाले. त्यानंतर ते सातत्यानं काँग्रेसकडून निवडून आले. २०२४ मध्ये त्यांचा पराभव झाला. नेमस्त, मुत्सद्दी, अजातशत्रू नेते अशी त्यांची ओळख आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद त्यांनी सांभाळलं आहे. महसूलसारखी महत्त्वाची खाती सांभाळण्याचा अनुभव त्यांच्या गाठिशी आहे. त्यामुळे थोरात यांना संधी दिल्यास पक्षाला राज्यात फायदा होईल, असं पक्षाला वाटतं.

शरद पवार आणि अजित पवार यांच्या पक्षांच्या विलिनीकरणाची चर्चा काही दिवसांपूर्वीपर्यंत जोरात सुरु होती. त्यामुळे शरद पवार यांचा पक्ष सत्तेत जाणार होता, हे स्पष्ट झालं. शरद पवार यांना निवडून दिल्यास आणि पुढे विलिनीकरणाचा विषय मार्गी लागल्यास काँग्रेसच्या हाती काहीही लागणार नाही, असा एक मतप्रवाह काँग्रेसमध्ये आहे. राहुल गांधी संसदेत सातत्यानं सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करतात. लोकसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची भाषणं चर्चेत असतात. अदानींच्या मुद्द्यावरुन ते मोदींवर टीका करतात.

# बापाला भयंकरपणे संपवलं, तुकडे करून पोत्यात भरलं, कालव्यात फेकलं अन म्हणतोय, 'सॉरी चुकून झालं'

**लखनौ :** उत्तर प्रदेशच्या राजधानी लखनौमध्ये एक अशी घटना घडली आहे, ज्याने संपूर्ण देश हादरला आहे. स्वतःच्या बापाचे तुकडे करून त्यांची विल्हेवाट लावणाऱ्या नराधम मुलाला, अक्षत सिंहला, बुधवारी अखेर जेलची हवा खावी लागली. आशियाना पोलिसांनी जेव्हा अक्षतला न्यायालयात हजर करण्यासाठी नेले, तेव्हा प्रसारमाध्यमांशी बोलताना त्याच्या चेहऱ्यावर कोणताही मोठा पश्चात्ताप दिसला नाही, उलट त्याने अत्यंत साध्या सुरात 'सॉरी, चुकून झाले' असे उत्तर दिले. एका प्रतिष्ठित व्यावसायिकाची त्याच्याच पोटच्या गोळ्याने केलेली ही निर्घृण हत्या आता संपूर्ण देशामध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.



२० फेब्रुवारीच्या पहाटे ४:३० वाजता ही थरारक घटना घडली आहे. पॅथॉलॉजी आणि दारूची दुकाने चालवणारे मानवेंद्र सिंह घरात गाढ झोपलेले होते. नीट (NEET) परीक्षेच्या अभ्यासावरून आदल्या रात्री बाप-लेकात कडाक्याचे भांडण झाले होते. याचाच राग मनात धरून अक्षतने बापाच्या डोक्याला रायफल लावून गोळी झाडली. या सुटलेल्या गोळीचा आवाज ऐकून त्याची बहीण कृती जागी झाली, मात्र अक्षतने तिला जीवे मारण्याची धमकी देऊन गप्प केले. हत्येचा थरार इथेच थांबला नाही. रक्ताने माखलेला आपल्या वडिलांचा मृतदेह अक्षतने ओढत बाथरूममध्ये नेला. तिथे त्याने सुरी आणि चाकूच्या सहाय्याने वडिलांचे हात-पाय कापले. रक्ताने माखलेली चादर, उशी आणि ब्लँकेट त्याने जाळून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

शरीराचे तुकडे पोत्यात भरून त्याने आपल्या कारच्या डिक्कीत टाकले आणि दुसऱ्या दिवशी सदरौना येथील कालव्याच्या झुडपात फेकून दिले. घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अक्षतने या हत्येसाठी आधीच नियोजन केले होते त्यासाठी त्याने आधीच ऑनलाइन चाकू ऑर्डर केले होते. तसेच त्याने सुरी आणि मोठा ड्रमही आधीच बाजारातून विकत आणला होता, म्हणजेच ही हत्या 'चुकून' झालेली नसून एक थंड डोक्याने रचलेला कट होता. आज जेव्हा पोलिसांनी त्याला घटनास्थळी नेले, तेव्हा त्याने निर्लज्जाप्रमाणे सर्व गुन्ह्याची कबुली दिली.

ज्या बापाने मुलाच्या भविष्यासाठी स्वप्ने पाहिली, त्यांचा अंत त्याच्याच मुलाच्या हातून झाला. विशेष म्हणजे, परंपरेनुसार मानवेंद्र यांच्या वडिलांनी अंत्यसंस्कारात भाग घेतला नाही आणि त्यांच्या चितेला अग्नी त्यांच्या पुतण्याने दिला. 'सॉरी' म्हणणारा अक्षत आता पोलिसांच्या ताब्यात असला, तरी त्याने केलेले हे कृत्य माणुसकीला काळीमा फासणारे ठरले आहे.

## संपत्तीवरुन वाद; भावाने बहिणीला संपवलं

**चंद्रपूर :** चंद्रपूरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सख्या भावानेच आपल्या बहिणीची धारदार शस्त्राने गळा चिरुन हत्या केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात आई देखील गंभीर जखमी झाली आहे. भद्रावती शहरातील झाडे प्लॉट परिसरात ही घटना घडली आहे. सुरज शंकर भोंडे (वय २८) असं आरोपीचं नाव असून संजीवनी शंकर भोंडे (वय ३२) असं मृत बहिणीचं नाव आहे. तर पुष्पा शंकर भोंडे (वय ५८) असं गंभीर जखमी झालेल्या आईचं नाव आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.संपत्तीच्या वादातून ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. गेल्या तीन ते चार दिवसापासून घरात वाद सुरु होता. यात आई व बहीण हे स्वतंत्र राहत होते, तर भाऊ आणि वडील वेगळे राहत असल्याची माहिती मिळाली आहे. आज संध्याकाळी झालेल्या जोरदार वादानंतर हा सर्व प्रकार घडला. भद्रावती पोलिसांनी या प्रकरणी आरोपी भावाला अटक केली असून वडिलांना देखील ताब्यात घेतलं आहे. घटनेचा पुढील तपास भद्रावती पोलीस करीत आहे.अशीच धक्कादायक घटना नालासोपारा येथे देखील घडली आहे.



नालासोपारा शहरात धक्कादायक घटना घडली असून मनोरूण भावाने बहिणीची हत्या केली आहे. तसंच या वादात मध्यस्ती करण्यासाठी गेलेली आईदेखील गंभीर जखमी झाल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे. नालासोपारा पूर्वेच्या टाकीरोड येथील सर्वोदय वसाहतीत मंगळवारी पहाटे ही घटना घडली असून या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. वसई विरार शहरातील एकाच आठवड्यातील ही चौथी हत्या आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनोरुण भावाने आपल्या सख्ख्या बहिणीची कोयत्याने वार करून हत्या केली. त्यानंतर भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या आईवरही या तरुणाने हल्ला केला. टाकी रोड येथील सर्वोदय वसाहतीत साईधाम वेल्फेअर चाळ आहे. या चाळीत सुप्रिया कानडे ही ३५ वर्षीय महिला राहते. तिची आई आणि भाऊ शेजारीच राहतात.


## आई-वडिलांच्या भांडणामुळे आत्महत्या

**नागपूर :** एकीकडे मुलं हे देशाचं भविष्य असल्याचं म्हटलं जात असताना, नागपुरातून एक अत्यंत सुन्न करणारी घटना समोर आली आहे. आई-वडिलांमध्ये वारंवार होणाऱ्या घरगुती वादामुळे सतत तणावात आणि नैराश्यात असलेल्या एका शाळकरी मुलीने राहत्या घरी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. ही हृदयद्रावक घटना हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील न्यू म्हाळगी नगर, शिवाजी लेआऊट येथे घडली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलगी अवघ्या ८व्या वर्गात शिक्षण घेत होती. गेल्या काही काळापासून तिच्या आई-वडिलांमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणावरून सतत घरगुती वाद होत होते. घरातील या कलहाचा आणि दररोजच्या भांडणांचा त्या चिमुरडीच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता.

घरात नेहमी राहणारे तणावाचं वातावरण तिला सहन होत नव्हतं, ज्यामुळे ती सतत नैराश्यात राहत होती. घरातील वातावरण तापलेले असताना, याच नैराश्यातून तिने टोकाचं पाऊल उचलण्याचं ठरवलं.

## इंजिनिअर प्रियकराशी ब्रेकअप, २१ वर्षीय यूट्यूबर तरुणीने आयुष्य संपवलं

**हैदराबाद :** २१ वर्षीय यूट्यूबर तरुणीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना हैदराबादमधील रायदुर्गम भागात समोर आली आहे. कोमली असे मयत तरुणीचे नाव आहे. आई परदेशी नोकरी करत असल्यामुळे कोमली तिच्या काकाच्या घरी राहत होती. तिथेच तिने आयुष्याची अखेर केल्याची माहिती आहे. यूट्यूबर तरुणासोबत असलेल्या नातेसंबंधातील वादातून तिने टोकाचं पाऊल उचलल्याचा अंदाज आहे.रायदुर्गमचे पोलीस इन्स्पेक्टर वेंकन्ना यांनी दिलेल्या माहितीनुसार मूळ विशाखापट्टणमची असलेली कोमली हैदराबादमध्ये बीएससीचे शिक्षण घेत होती. ती अर्धवेळ यूट्यूबर म्हणून काम करत होती. तिची आई कुवेतमध्ये काम करते, तर तिचे वडील विझागमध्ये राहत होते, त्यामुळे ती तिच्या काकांसोबत मणिकोंडाच्या चित्रपुरी कॉलनी एलआयजीमध्ये राहत होती.व्यवसायाने सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेला विशाखापट्टणम येथील तरुण अखिल रेड्डी याच्यासोबत ती रिलेशनशीपमध्ये होती. तोसुद्धा यूट्यूबर आहे. गेल्या वर्षी झालेल्या मतभेदांमुळे ते वेगळे झाले होते.इन्स्पेक्टर



वेंकन्ना म्हणाले की 'ते दोन वर्षांपासून एकमेकांना ओळखत होते. अखिलला ती आवडत नव्हती पण तरीही ती त्याचा पाठलाग करत होती. कोमलीचे अजूनही एकतर्फी प्रेम होते. त्याने तिला एकटं सोडण्याची अनेक वेळा विनंती केली, पण ती ब्रेकअपने दुखावली होती'कोमलीने सहा महिन्यांपूर्वीही आत्महत्येचा प्रयत्न केला होता, परंतु तिच्या नातेवाईकांनी हस्तक्षेप करून तिचं समुपदेशन केले. दोन दिवसांपूर्वी तिने अखिलला फोन केला, तेव्हा दोघांमध्ये वाद झाला आणि मंगळवारी तिने आत्महत्या केली.

या घटनेची माहिती मिळताच रायदुर्गम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी उस्मानिया रुग्णालयात हलवला. रायदुर्गम पोलिसांनी सांगितले की, गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# पत्नी नांदायला येत नाही म्हणून राग; अमितने सासऱ्याचा काटा काढला

**अहिल्यानगर :** संसारातील वाद टोकाला गेले आणि संतापाच्या भरात जावयानेच सासऱ्याचा गळा आवळून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना पारनेर तालुक्यात उघडकीस आली आहे. ढवळपुरी शिवारातील डोंगरात आढळलेल्या मृतदेहाचे गूढ अखेर उलगडले असून, पोलिसांनी अवघ्या ७२ तासांत आरोपी जावई आणि त्याच्या साथीदाराला जेरबंद केले आहे. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्यापूर्वी ढवळपुरी शिवार (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथे रामदास निवृत्ती सोनवणे (वय ५५, रा. निमगाव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे) यांचा गळा आवळून खून करून मृतदेह डोंगरात टाकण्यात आल्याची घटना समोर आली होती. या



प्रकरणी तुळशीराम निवृत्ती सोनवणे (वय ५८, रा. सुलतानपूर, ता. जुन्नर) यांनी २५ फेब्रुवारी रोजी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने तपासाचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. घटनास्थळाची बारकाईने पाहणी, तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयाची सुई थेट मृताच्या जावयाकडे वळवली. तपासात उघड झाले की, अमित नारायण डुकरे (वय ३४, रा. पारगाव तर्फे आळे, ता. जुन्नर) आणि त्याचा मित्र अमोल उत्तम डुकरे (वय ३१, रा. औरंगपूर, ता. जुन्नर) यांनी मिळून हा कट रचला होता. २५ फेब्रुवारी रोजी दोघांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता धक्कादायक कबुली समोर आली.आरोपी अमित डुकरे याची पत्नी गेल्या वर्षभरापासून माहेरी राहत होती. त्यांना सव्वा वर्षांची मुलगी आहे. चौकशीत अमितने कबूल केले की, सासरे वारंवार वाद घालत होते आणि मुलीला ठार मारण्याची धमकी देत होते. या संतापातून त्याने मित्राच्या मदतीने सासऱ्याला कारमध्ये बसवून नेले आणि गळा आवळून त्यांचा खून केला. त्यानंतर मृतदेह ढवळपुरी शिवारातील डोंगरात फेकून दिला.दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी पारनेर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. अहिल्यानगर जिल्ह्यातील या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून, कौटुंबिक वाद किती भीषण वळण घेऊ शकतो, याचे हे आणखी एक उदाहरण ठरले आहे.

# भारताची ‘फुलराणी’ सायना नेहवालचा वयाच्या ३५ व्या वर्षीच निवृत्तीचा निर्णय

**मुंबई/वृत्तसंस्था :** भारताची फुलराणी म्हणून ओळखली जाणारी स्टार बॅडमिंटन खेळाडू सायना नेहवाल हिने निवृत्ती जाहीर केलीय. गेल्या अनेक वर्षांपासून कोर्टपासून लांब असलेल्या सानियाने अखेर निवृत्तीची घोषणा केली आहे. २०२३ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये तिने शेवटची स्पर्ध खेळली होती. त्यानंतर गुडघ्याच्या दुखापतीमुळे ती बऱ्याच काळापासून कोर्टपासून दूर राहिली. दोन वर्षांपूर्वी एका पॉडकास्टमध्ये सानियाने तिच्या दुखापतीबाबत आणि निवृत्तीवर भाष्य केलं होतं.मी दोन वर्षांपूर्वीच खेळणे सोडले होते. मला वाटले की मी माझ्या अटींवर खेळायला सुरुवात केली होती तर माझ्या अटींवरच निवृत्ती घेईल. त्यामुळे मला निवृत्तीची काही घोषणा करण्याची गरज नाही. जर तुम्हा खेळण्यासाठी सक्षम




नसाल तर काही हरकत नाही, असं सायना नेहवाल म्हणाली होती. आता निवृत्तीचा निर्णय गुडघ्याच्या गंभीर सम स्येमुळे घेण्यात आला, ज्यामुळे प्रशिक्षण घेणं अशक्य झालं होतं, असं सायना नेहवाल म्हणाली.गुडघ्याची गादी पूर्णपणे खराब झाली, संधीवाताचा त्रास आहे ही गोष्ट माझ्या पालकांना आणि प्रशिक्षकाला माहित असायला हवी होती. मी त्यांना फक्त एवढेच सांगितले, आता कदाचित मी हे आणखी करू शकणार नाही, हे कठीण आहे. लोकांना हळूहळू कळायला लागलं होतं की सायना खेळत नाहीये. जगात सर्वोत्तम बनण्यासाठी तुम्ही आठ ते नऊ तास प्रशिक्षण घेता पण माझा गुडघा एक किंवा दोन तासांतच साथ देत होता, असंही सायना नेहवाल याने म्हटलं आहे. सायना नेहवाल बॅडमिंटनमध्ये ऑलिम्पिक कांस्यपदक जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली. २०१५ मध्ये ती जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचली होती. २००८ मध्ये तिने बीडब्ल्यूएफ वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिप जिंकली, तर २०१० मध्ये तिने सुपर सीरिजचे विजेतेपद पटकावले. २०१० आणि २०१८ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये तिने सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धांमध्ये दोन एकेरी सुवर्णपदके जिंकणारी ती पहिली भारतीय बॅडमिंटनपटू आहे. भारत सरकारने तिला २००९ मध्ये अर्जुन पुरस्कार, २०१० मध्ये मेजर ध्यानचंद खेल रत्न, २०१० मध्ये पद्मश्री आणि २०१६ मध्ये पद्मभूषण यांसारख्या प्रतिष्ठित नागरी आणि क्रीडा सन्मानांनी गौरवले आहे.सायनाच्या निवृत्तीमुळे भारतीय बॅडमिंटनला मोठा धक्का बसला आहे. तिने आपल्या कारकिर्दीत अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा दिली आहे. तिच्या खेळातील आक्रमकता आणि चिकाटी नेहमीच वाखाणण्याजोगी राहिली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे तिला अनेकदा वेदना सहन कराव्या लागल्या, तरीही तिने हार मानली नाही.

## प्री वेडिंग सेलिब्रेशनसाठी जाम नगरला पोहोचले अर्जुन-सानिया

**जामनगर/वृत्तसंस्था :** क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर यांचा मुलगा अीर्क्षिप ढशपर्वीश्रज्ञरी लवकरच लग्नाच्या बेडीत अडकणार आहे. वृत्तानुसार, तो ५ मार्च रोजी एका प्रसिद्ध उद्योगपतीची मुलगी Saaniya Chandhok लग्न करणार आहे. लग्नाची सर्व तयारी ३ मार्च रोजी सुरू होईल. लग्न समारंभ खाजगी असेल आणि त्यात काही निवडक लोक उपस्थित राहतील. तेंडुलकर कुटुंबाने अलीकडेच पंतप्रधान मोदींना आमंत्रित केले होते. लग्नापूर्वी, संपूर्ण तेंडुलकर कुटुंब लग्नापूर्वीच्या सम रंभासाठी जामनगरला गेले होते, जिथे नीता अंबानी यांनी खास भाषण दिले. मुंबई इंडियन्सने त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये जामनगरमधील संपूर्ण तेंडुलकर आणि अंबानी कुटुंबे दिसत आहेत. लग्नापूर्वीच्या समारंभासाठी जमलेल्या सर्व पाहुण्यांशी बोलताना नीता अंबानी म्हणाल्या, 'जामनगरमध्ये सर्वांचे स्वागत आहे. आज, आपण सर्वजण या ठिकाणी परतलो आहोत. अनंत आणि राधिकानेही दोन वर्षांपूर्वी लग्नाच्या कार्यक्रम इथे केलो होतो. सचिन आणि अंजली आमच्यासाठी कुटुंबासारखे आहेत. मला खूप आनंद आहे की आपण हा आनंद एकत्र शेअर करत आहोत.'संपूर्ण कुटुंब जामनगरमध्ये लग्नापूर्वीच्या सेलिब्रेशनसाठी जमले होते. अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चांडोक यांचा साखरपुडा १३ ऑगस्ट २०२५ रोजी झाला. साखरपुडा अतिशय खाजगी ठेवण्यात आला होता, फक्त दोन्ही कुटुंबे उपस्थित होती. साखरपुड्याला दोन्ही कुटुंबातील जवळचे सदस्य उपस्थित होते. नंतर सचिन तेंडुलकरने साखरपुड्याची पुष्टी केली. सानिया आणि अर्जुन हे बालपणीचे मित्र आहेत आणि एकमेकांना बऱ्याच काळापासून ओळखतात. सानिया एका व्यावसायिक कुटुंबातून येते.

## होय, मी चुकीचं आऊट दिलं! सचिन तेंडुलकरला आऊट देणाऱ्या अम्पायरकडून २२ वर्षांनी खुलासा..

**मुंबई/वृत्तसंस्था :** क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर खेळत असताना डीआरएस असता तर नक्कीच त्याची आणखीन कमीत कमीत दहा ते बारा शतके असतीत. यंत्रणा नव्हती मान्य पण अम्पायरच्या चुकीच्या निर्णयांमुळेही अनेकदा खेळाडू आऊट झाले आहेत. त्यावेळचा एक अम्पायर जो कायम सर्वांच्या डोक्यात जायचा, कारण ठरवून दिल्यासारखा चुकीचा निर्णय तो देत होता. मात्र अम्पायरन स्टीव बकनर यांनी २२ वर्षांनंतर आपल्या चुकीची कबुली दिलीय. नेमकं काय म्हणाला?स्टीव बकनर यांनी अनेकदा सचिन तेंडुलकरविरुद्ध निर्णय दिले असे म्हटले जाते. बकनर यांनीच आपला एक निर्णय चुकल्याची कबुली दिली.



ऑस्ट्रेलियातील २००३-०४च्या कसोटीत सचिनला पायचीत देण्याचा निर्णय चूक होती,' असे बकनर यांनी मान्य केले आहे. सोशल मीडियावर पाहिल्यावर पहिल्यांदा पाहताच कोणीही सांगेल आऊट की नॉट आऊट? पण बकनर यांनी सचिनला आऊट द्यायचं आहे हे मनाशी खूनगाठ बांधलेली.बकनर यांनी सचिनच्या बाबतीत काही वादग्रस्त निर्णय दिले होते. त्यापैकी सर्वांत धक्कादायक निर्णय २२ वर्षांपूर्वी ब्रिस्बेनच्या 'गॅबा' कसोटीतील होता. 'सचिनला पायचीत बाद देणे ही चूक होती हे मला ठाऊक आहे. आजही लोक दररोज त्याबद्दल बोलतात, मी त्याला बाद का दिले? तो बाद होता का? वगैरे... पण, जीवनात चुका घडतात. मी ती चूक होती हे स्वीकारले आहे,' अशी कबुली बकनर यांनी दिली.गॅबा येथील त्या कसोटीत सचिन तीन धावांवर होता. जेसन गिलेस्पीचा चेंडू बाहेर जाईल या अपेक्षेने सचिनने तो सोडला. चेंडू त्याच्या पॅडवर वरच्या भागाला लागला. ऑस्ट्रेलियाचे अपील पंच बकनर यांनी उचलून धरले. रिप्लेत सचिन नाबाद असल्याचे दिसले. बॉल ट्रॅकिंग यंत्रणेने चेंडू सचिनच्या पॅडला लागला नसता तर यष्टीवरून गेला असते असे दाखवले. यापूर्वी २००५ मध्ये ईडन गार्डन्सवर पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात अब्दुल रझ्झाकच्या गोलंदाजीवर तेंडुलकरला बकनर यांनी झेलबाद दिले होते. रिप्लेमध्ये बॅट आणि चेंडूमध्ये मोठे अंतर असल्याचे दिसत होते.

## आयपीएलपूर्वी वैभवने राजस्थान रॉयल्सने केलं मोठं नुकसान




**मुंबई/वृत्तसंस्था :** नुकताच अंडर १९ विश्वचषक पार पडला जो भारताने जिंकला. या विश्वचषकाच्या फायनल सामन्यात वैभवने पराक्रम केला. फायनल सामन्यात त्याने १७५ धावा केल्या. यानंतर आता लगेचच आयपीएलच्या तयारीला लागला आहे. तरळलहरीं डींूरींरपीहळ सध्या खझङ २०२६ च्या तयारीसाठी राजस्थान रॉयल्सच्या प्रशिक्षण शिबिरात आहे. राजस्थान रॉयल्सच्या प्रशिक्षण शिबिरात फलंदाजीच्या सरावादरम्यान, वैभव सूर्यवंशीने एक मोठं नुकसान केलं आहे.वैभव सूर्यवंशी त्याच्या लांब षटकारांसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. वैभव सूर्यवंशी आगामी आयपीएलसाठी राजस्थान रॉयल्सच्या प्रशिक्षण शिबिरात अथक परिश्रम करत आहे. त्यादरम्यान, त्याने एक शक्तिशाली शॉट मारला जो त्याच्या बॅटला लागल्यानंतर जमिनीजवळील पाण्याच्या पाईपवर आदळला. चेंडू ज्या वेगाने पाईपवर आदळला त्या वेगाने तो फुटणे निश्चित होते. अगदी तसेच घडले. वैभवने त्याच्या षटकाराने पाण्याचा पाईप फोडला. आता सराव सत्रा दरम्यानचा वैभवचा व्हिडिओ सोशल मीडियावर राजस्थान रॉयल्सने अपलोड केला. जो आता म ोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.आयपीएल २०२६ च्या राजस्थान रॉयल्स प्रशिक्षण शिबिरात सराव करण्यासाठी वैभव सूर्यवंशीने त्याची १० वी बोर्ड परीक्षा सोडली. यावेळी तो परीक्षा देत नाही. राजस्थान रॉयल्स प्रशिक्षण शिबिरात कठोर परिश्रम करणे त्याच्यासाठी किती महत्त्वाचे आहे हे यावरून दिसून येते. वैभव सूर्यवंशीने गेल्या हंगामात आयपीएलमध्ये पदार्पण केले. आयपीएल २०२५ मध्ये तो फक्त ३५ चेंडूत शतक झळकावून चर्चेत आला. आणि तेव्हापासून तो सातत्यपूर्ण आहे. आता, त्याने आयपीएल २०२६ मध्ये आणखी मोठा प्रभाव पाडण्याचे लक्ष्य ठेवले आहे आणि ते साध्य करण्यासाठी तो कोणतीही कसर सोडत नाही.

आयपीएल आता २६ मार्चपासून सुरु होणार आहे. यासाठी सगळ्याच संघानी आपला जोरदार सराव सुरु केला आहे. काही खेळाडू सध्या विश्वचषक खेळत असल्यामुळे ते नंतर आयपीएलसाठी आप आपल्या संघात सामील होतील. विश्वचषकाची फायनल सामना हा ८ मार्चला रंगेल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राखी, राकेश, प्राजक्ता की रोशन कोण घराबाहेर जाणार? 'या' नावाची तुफान चर्चा




**मुंबई :** 'बिग बॉस मराठी ६' च्या घरात सातवा आठवडा सुरू झाला आहे. या आठवड्यात तन्वी कोलते घराची कॅप्टन असल्यामुळे ती नॉमिनेशन पासून सुरक्षित आहे. तर झुशी घशू मिळाल्यामुळे प्रभू आणि अनुश्री देखील या आठवड्यात सुरक्षित आहेत. नॉमिनेशन टास्कमध्ये शेवटच्या क्षणी रुचिता टोळीच्या विरोधात जाते.

बिग बॉसच्या घरात 'नॉमिनेशनचा लगाम' हा टास्क पार पडला. यात सदस्यांच्या गळ्यात एकमेकांच्या फोटोंच्या पाट्या दिसतात. ज्या सदस्याला नॉमिनेट करायचे आहे. त्याची पाटी गळ्यातून काढून टाकावी लागते. राकेशने रोशनला नॉमिनेट केले, रुचिताने राकेशला नॉमिनेट केले, राखी सावंतने प्राजक्ताला सुरक्षित करून स्वतः नॉमिनेट झाली. शेवटी तन्वीने प्राजक्ताला नॉमिनेट केले. बिग बॉसच्या घरातून सातव्या आठवड्यात एकूण चार सदस्य नॉमिनेट झाले आहेत. यात प्राजक्ता शुक्रे, राकेश बापट, राखी सावंत आणि रोशन भजनकर यांचा समावेश आहे. या आठवड्यात तगडी स्पर्धा पाहायला मिळणार आहे. कारण प्रेक्षकांचे आवडते कलाकार नॉमिनेट झाले आहेत. यात प्रामुख्याने दोन नावांची चर्चा पाहायला मिळत आहे. पहिले नाव म्हणजे राखी सावंत आणि दुसरे प्राजक्ता शुक्रे होय. राखी ही बिग बॉसच्या घरात पाहुणी कलाकार म्हणून आली होती. तिने दोन आठवडे घरात राडा घातला आहे. त्यामुळे ती या आठवड्यात बाहेर जाऊ शकते.

येणारा भाऊचा धक्का खूपच खास असणार आहे. रितेश भाऊ कोणाची शाळा घेणार आणि कोणाचे कौतुक करणार पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. घरात आता राखी-राकेश, दिपाली-अनुश्री, प्रभू-प्राजक्ता, विशाल-रुचिता यांच्यात भांडणे पाहायला मिळत आहे.

## रश्मिका-विजय आज अडकणार लग्नबंधनात



**मुंबई :** सध्या देशात एका लग्नाची जोरदार चर्चा रंगलीय, ते लग्न म्हणजे, साऊथ सुपरस्टार रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा. दोघेही आज म्हणजे २६ फेब्रुवारी रोजी उदयपूर इथे लग्नबंधनात अडकणार आहेत. या दोघांच्या लग्नासोहळ्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत. सध्या रश्मिका आणि विजय यांच्या लग्नापूर्वीच्या सोहळ्यांना सुरुवात झाली आहे. त्यांच्या लग्नाची थीम 'प्राइमल' असणार आहे. पारंपरिक आणि अगदी साध्या पद्धतीने हा सोहळा पार पडणार आहे.

विजय देवरकोंडा आणि रश्मिका या सुपरस्टार जोडीच्या लग्नाला फक्त कुटुंब आणि जवळचे मित्र उपस्थित राहणार असल्याचे वृत्त आहे. लग्नाचे ठिकाण राजेशाही आहे आणि लग्नाच्या थीमपासून ते स्टाईलपर्यंत सर्व काही साधे आणि स्टायलिश असणार आहे. विजय देवरकोंडाने त्याच्या इंस्टाग्रामवर याची एक झलक देखील शेअर केली आहे.

तेलुगू आणि कोडावा या दोन्ही संस्कृतींचा आदर करत दोन वेगवेगळ्या प्रथेप्रमाणे 'विरोश' यांचे विधी पार पडणार आहेत. 'विरोश' यांच्या लग्नाच्या विधींची सुरुवात विजय देवरकोंडाच्या पारंपारिक तेलुगू हिंदू विधींनुसार होणार आहे. हा सोहळा सकाळी ८ वाजता सुरु होईल. त्यानंतर संध्याकाळी कोडावा समारंभ होईल, ज्यामध्ये रश्मिका मंदानाच्या कुटुंबियांच्या परंपरेने चालत आलेल्या विधी होणार आहेत.


***

## वाढदिवसाच्या दिवशी प्रसिद्ध दिग्दर्शकाला हार्ट अटॅक? रुग्णालयात दाखल ; नेमकं सत्य काय?

**मुंबई :** एखाद्याचा जन्म दिवस सगळेच आनंदात आणि उत्साहात साजरा करतात. महाराष्ट्रात वाढदिवसाच्या दिवशी त्या व्यक्तीचे औक्षण केले जाते. मात्र सिनेसृष्टीतले एक प्रसिद्ध दिग्दर्शक संजय लीला भन्साळी अचानक सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसले. त्यांचा बद्दल अनेक अफवा पसरताना दिसत आहेत. ती उफवा म्हणजे त्यांच्या ६३व्या वाढदिवशी त्यांना हार्ट अटॅक आला. त्यांना मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची चर्चा जोरात सुरू होती. मात्र या सर्व बातम्या पूर्णपणे खोट्या आणि आधारहीन असल्याचे स्पष्ट झालं आहे.

भन्साळी यांच्या टीमकडून अधिकृत निवेदन जारी करण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, ''संजय लीला भन्साळी यांच्या रुग्णालयात दाखल होण्याच्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या आहेत. त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही. कृपया अशा अप्रमाणित बातम्यांवर विश्वास ठेवू नका.'' या स्पष्टीकरणानंतर अफवांना पूर्णविराम मिळाला आहे.

ही अफवा 'मामाराजी' नावाच्या एका इन्स्टाग्राम पेजवरून सुरू झाली. त्या पोस्टमध्ये भन्साळी यांना वाढदिवशी हार्ट अटॅक आल्याचा दावा करण्यात आला होता. तसेच मुंबईतील एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे म्हटले गेले. मात्र या पोस्टला कोणताही अधिकृत पुरावा नव्हता.



भन्साळी यांच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर ते सध्या त्यांच्या आगामी चित्रपटाच्या तयारीत व्यस्त आहेत. त्यांनी यापूर्वी दिग्दर्शित केलेली वेब सिरीज कशशीरारपवळ प्रेक्षकांच्या मनात घर करुन राहीली आहे. आता ते 'लव्ह अँड वॉर' या नव्या चित्रपटावर काम करत आहेत. या चित्रपटात आलिया भट्ट , रणबिर कपूर आणि विकी कौशल प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

एकूणच, सोशल मीडियावर पसरलेल्या अफवांवर विश्वास ठेवण्यापूर्वी अधिकृत माहितीची खातरजमा करणे आवश्यक आहे. सध्या संजय लीला भन्साळी पूर्णपणे निरोगी असून त्यांच्या आगामी प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करत आहेत.




## शिल्पा शेट्टीचं रेस्टॉरंट एकदम भारी, दिवसाची कमाई २-३ कोटी?

**मुंबई :** बॉलिवूडची अभिनेत्री शिल्पा शेट्टीचे मुंबईतील बास्टियन हे आलिशान रेस्टॉरंट पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. शिल्पा या रेस्टॉरंटमधून दररोज सुमारे २-३ कोटी रुपये कमावते अशी माहिती समोर आली होती. त्यामुळे अनेकांनी या रेस्टॉरंटला कुबेराचा खजिना असे म्हटले होते. लोक लॅम्बोर्गिनीसारख्या महागड्या गाड्यांमध्ये या रेस्टॉरंटमध्ये येतात. तसेच ग्राहकांच्या टेबलांवर लाखोंचे बिल येते अशी माहिती समोर आली होती. मात्र आता बास्टियनचे सह-मालक रणजित बिंद्रा यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी नेमकं काय म्हटलं ते जाणून घेऊयात.समोर आलेल्या माहितीनुसार, अभिनेत्री शिल्पा शेट्टीने २०१९ मध्ये बास्टियन ब्रँडचे सह-मालक रणजित यांच्यासोबत पार्टनरशिप केली होती. रणजित यांचा या रेस्टॉरंटमध्ये ५० टक्के हिस्सा आहे. कर्ली टेल्स सोबतच्या संभाषणात रणजित यांनी रेस्टॉरंटच्या उत्पन्नाबद्दल माहिती विचारण्यात आली होती. रेस्टॉरंट खरोखरच दररोज २-३ कोटी रुपये कमावते का? यावर उत्तर देताना रणजित म्हणाले की, 'कदाचित ही माहिती सत्य असायला हवी होती. पण मला खात्री आहे की हे एक दिवस खरे होईल.लेखिका शोभा डे यांनी बास्टियन २-३ कोटी रुपये कमवत असल्याची माहिती दिली होती. त्यांनी म्हटले होते की, मुंबईतील एका रेस्टॉरंटमध्ये दररोज २-३ कोटी रुपये आणि वीकेंडला ३ कोटी रुपयांची उलाढाल होते. मी स्वतः रेस्टॉरंट पाहण्यासाठी गेले होते. मात्र आता रेस्टॉरंटच्या सह-मालकांनी शोभा डे यांचे सर्व दावे खोडून काढले आहेत.रणजीत बिंद्रा यांनी शिल्पा शेट्टीला रेस्टॉरंटमध्ये पार्टनर का बनवले याची माहितीही समोर आली आहे. रणजीत म्हणाले की, 'शिल्पा पार्टनर बनल्यामुळे एक वेगळीच ऊर्जा संचारली. तिच्याशी बोलल्यावर नेहमीच सकारात्मक वातावरण निर्माण होते. मला नेहमीच शिल्पाने बास्टियनचा भाग व्हावे असे वाटत होते. ती माझी लकी चार्म होती. शिल्पा तिची भूमिका उत्तमरित्या बजावते. तिचे इनपुट नेहमीच महत्त्वाचे असतात. ती माझ्या मोठ्या बहिणीसारखी आहे; ती जे काही बोलते ते मी ऐकतो.'

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतले संत गजानन महाराज समाधीस्थळाचे दर्शन

**जनसंचलन/बुलढाणा**

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत श्री गजानन महाराज समाधीचे दर्शन घेतले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण, आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, संत गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त निळकंठ शिवशंकर पाटील, हरिहर निळकंठ पाटील यांच्यासह आयुष मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी संत श्री गजानन महाराज संस्थानच्यावतीने महामहिम राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. यानंतर राष्ट्रपती महोदयांनी संत श्री गजानन महाराज यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी मंदीर परिसराची माहिती घेत पाहणी केली. यानंतर राष्ट्रपती महोदयांचे राष्ट्रीय आरोग्य मेळावा मुख्य कार्यक्रमस्थळी प्रस्थान झाले.



# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे शेगांव येथे आगमन व स्वागत

**जनसंचलन/बुलढाणा**



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज सकाळी शेगांव येथील आनंद विहार हेलिपॅडवर आगमन झाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, विभागीय आयुक्त डॉ. स्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोखले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी पवन भालेराव

**जनसंचलन/बुलढाणा**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव हा बुलढाणा शहरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती पासून सुरु झालेला हा उत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी भव्य रॅलीत रूपांतरीत होऊन लाखोंच्या उपस्थितीत साजरा करण्यात येतो या कार्यक्रमाच्या नियोजनची भूमिका सार्वजनिक जयंती उत्सव समिती पार पाडत असते. यावर्षीच्या बुलढाणा शहर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पवन भालेराव यांची निवड करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती ची सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी विश्राम भवन येथे नवीन अध्यक्ष निवडण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी २०२५ चे अध्यक्ष निलेश राऊत हे होते. उत्सव समितीने अजित केलेल्या विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचा लेखाजोखा प्रस्ताविकेतून आशिष बाबा खरात यांनी मांडला. बैठकीचे अध्यक्ष निलेश राऊत यांनी २०२५ मध्ये आयोजित केलेल्या वर्षभरातील विविध कार्यक्रमांचा आढावा व आयोजन सहकार्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले व यावर्षीचा नियोजनाचा प्रस्ताव व या बैठकीत मांडला नवनियुक्त अध्यक्ष पवन भालेराव यांनी या वर्षी जयंती ही नाविन्यपूर्ण व ऐतिहासिक करण्यासाठी समाज बांधवांनी सहकार्य करावे ही आशा व्यक्त केली. या वेळी आशिष बाबा खरात नगरसेवक प्रशांत जाधव वैशालीताई ठाकरे गणेश इंगळे निलेश गायकवाड कुणाल पैठणकर अमोल खरे अमोल वाठोरे उमेश हेलोडे सनी पैठणे मंगेश इंगळे या बैठकीत बुलढाणा शहरातील तरुण वर्ग उपस्थित होता.



# मुहम्मद पैगंबर सर्वासाठी मधून उभारणार सामाजिक चळवळ


**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील मुस्लिम बांधवाच्या वतीने यंदा पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर पैंगबर सर्वासाठी हे अभिनव अभियान राबवन्यात येणार आहे.समाज बांधवकडून अनाथ बालके व गरजु कुटुंबयासमवेत ईद साजरी केली जाणार आहे अशी बातमी मोहसिन शेख ( अभियानचे जिल्हा सदस्य) यांनी दिली रमजान हा समस्त मानव सेवेसाठी समर्पित समाज निर्माण करण्यासाठीचा प्रशिक्षणाचा महीना आहे. रोजा हा वाईट गोष्टीचा त्याग,सत्कर्म,परोपकार,नैतिकता, करुणा,दयाशीलता,व गरजु शोषित अनाथ बालके व विधवाना मदत करण्याची प्रेरणा देतो,इस्लाम हा केवळ मुस्लिमाचा धर्म आहे हा गैरसमज असून इस्लाम ही मानव जातीची जीवन पद्धति आहे ह़ज़रत मुहम्मद पैंगबार याचा संदेश प्रत्यक्ष कृतितुन समाजापुढे आणण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आलेले आहे. गरजु व आत्महत्याग्रस्त शेतकरी मुलाना बुलडाणा जिल्ह्यात १०० पेक्षा जास्त मुला सोबत ईद साजरी केली जाणार आहे व त्यांना कपड़े व शिरखुरमाची मेजवानी करण्यात येणार आहे. आमच्या जवळ २०० पेक्षा जास्त मुलाना कपड़े जमा झालेले आहे



जर आपण गरजु व गरीब मुलांच्या चेहऱ्यावर हसू पहायचे आहे तर आपली साथ मोलाची राहिल अभियान मध्ये आबीद सर, कुरेशी नदीम भाई,शोएब भाई,रियाज भाई, वसीम अली सर, शरीफ भैया पोलिस इम्रान भाई,मेडिकल सदाम हुसे महमुद शेख,यूसूफ सर,अबिद कुरेशी,इमरान खान आदीचा सहभाग आहे.





# तुकाराम मुंढेंची परभणीच्या जिल्हा प्रशासनात एन्ट्री; बुलढाण्यातील बोगस दिव्यांग प्रकरणावरही कडक नजर?

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी हालचाल झाली असून कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जाणारे तुकाराम मुंढे यांची परभणीच्या पालक सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून काम पाहणारे मुंढे आता थेट जिल्हा प्रशासनावर लक्ष ठेवणार आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे परभणीसह संपूर्ण राज्यातील प्रशासनात खळबळ उडाली आहे. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह एकूण सहा वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांवर नव्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी, प्रलंबित प्रकरणांची तातडीने सोडवणूक आणि कल्याणकारी योजनांचा आढावा घेणे ही पालक सचिवांची प्रमुख जबाबदारी असते. प्रत्येक तीन महिन्यांनी जिल्हा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी करणेही बंधनकारक आहे.दरम्यान, बुलढाणा जिल्हा परिषदेत कथित बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणामुळे वातावरण तापले आहे. नियमबाह्य पद्धतीने प्रमाणपत्रे देणे-घेणे आणि त्यातून कमावलेल्या कथित कोट्यवधींच्या चल-अचल संपत्तीबाबत पुराव्यानिशी माहिती सादर करण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा आहे. दोषींवर फौजदारी कारवाई होईपर्यंत पाठपुरावा करण्याचा निर्धार संबंधितांकडून व्यक्त होत आहे.




यापूर्वी सोलापूरचे जिल्हाधिकारी तसेच नाशिक व नागपूर महापालिकांचे आयुक्त म्हणून कठोर निर्णय घेणारे मुंढे आता परभणीत प्रशासनाला नवा वेग देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या एन्ट्रीमुळे बुलढाणा सहित राज्यातील विविध जिल्ह्यांतील प्रलंबित आणि संवेदनशील प्रकरणांवरही कडक नजर ठेवली जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चिखलीत वायझडी तलावाची स्वच्छता !



जनसंचलन/ चिखली

स्वच्छ जल, स्वच्छ मन या संदेशाने प्रेरित होऊन संत निरंकारी मंडळ शाखा चिखलीच्या वतीने प्रोजेक्ट अमृत अंतर्गत येथील वायझडी तलावाची स्वच्छता करण्यात आली. जलसंरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचा सामूहिक संकल्प दृढ करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या पुढाकाराने, सतगुरू माता सुदीक्षा महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात १६०० हून अधिक ठिकाणी २२ फेब्रुवारी रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत चिखली शाखेच्यावतीने स्थानिक वायझडी तलावावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी जिल्हा संयोजक तथा ज्ञानप्रचारक शालिकराम चवरे, न. प. आरोग्य सभापती विष्णू जोगदंडे, नगरसेवक दीपक वाधवानी, पुरुषोत्तम वायाळ, अमोल लहाने, श्रीराम झोरे आणि गोकुळ शिंगणे उपस्थित होते. चवरे यांनी मंडळाच्या सेवा कार्याची माहिती दिली.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४